# ९. झोपाळा गेला उडून

- चित्रे पाहा. चित्रांत काय काय दिसते ते सांगा.
- पाहा. ऐका. म्हणा.



एका तळ्यात दोन बेडूक होते.
एकदा त्यांना पाण्यात दोन खांब दिसले.
त्यांनी एक वेल आणून खांबांना बांधला.



वेलाचा छानदार झोपाळा तयार झाला.
दोघेही बेडूक त्यावर बसून झोके घेऊ लागले.



तोच काय गंमत झाली, अचानक तो
झोपाळा उडू लागला !



ते दोन खांब नसून एका बगळ्याचे पाय आहेत,
हे लक्षात आल्यावर बेडकांनी पटकन पाण्यात
उड्या मारल्या.